राज्यातील कृषी सिंचन, घरगुती व औद्योगिक
प्रयोजनार्थ वापरल्या जाणा-या पाण्यासाठी ठोक
जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
९ वा मजला, सेंटर १, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, मुंबई ४००००५
दि. २९ मार्च २०२२

# ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेश

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५.

२) ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरता दृष्टीनिबंध (ऑक्टोबर २०१९)

३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे), मार्गदर्शक सूचना २०१९.

## १.० प्रस्तावना

१.१ महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, तसेच जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता व पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (यापुढे "अधिनियम" असे संबोधले आहे) पारित करण्यात आला. कलम ३(१) अन्वये अधिनियमातील तरतुदीच्या प्रयोजनार्थ दि. ४ मे २००५ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (यापुढे "प्राधिकरण" असे संबोधले आहे) गठित करण्यात आले.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

१.२ अधिनियमातील कलम ११(घ) अन्वये सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाण्याचे दर (जलप्रशुल्क) निर्धारणाची पद्धत ठरविण्याचे आणि पाणीपट्टीचे निकष ठरविण्याचे अधिकार प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेले आहेत.

१.३ अधिनियमाचे कलम ११(प) अन्वये दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण करण्याची तरतूद आहे.

१.४ यापूर्वी प्राधिकरणाने दि. ११ जानेवारी २०१८ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील घरगुती, औद्योगिक व कृषी क्षेत्रातील पाणी वापरासाठीचे ठोक जलदर निश्चित केलेले होते.

१.५ अधिनियमातील तरतूदीनुसार प्राधिकरणाने प्रारुप निकष व प्रारुप जलप्रशुल्क प्रस्तावावर विविध उपभोक्त्यांची मते विचारात घेऊन विहित केलेल्या निकषाद्वारे घरगुती, कृषी व औद्योगीक ठोक जलप्रशुल्क निर्धारित केले आहेत.

## प्राधिकरणाचे आदेश

२.० अधिनियमातील कलम ११(घ) व ११(प) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्रातील कृषी - सिंचन, घरगुती व औद्योगिक प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठीचे ठोक जल प्रशुल्क (पाणीपट्टी) चे सुधारित दर सोबतच्या परिशिष्ट १ ते ३ मध्ये नमूद केलेल्या अनुषंगीक तरतूदीसह लागू होतील.

२.१) प्रवाही सिंचनाचे दर परिशिष्ट १ मधील तक्ता क्र. १ नुसार राहतील.खाजगी उपसा सिंचन योजनांचे (उसिंयो) दर परिशिष्ट १ मधील तक्ता क्र. २ नुसार राहतील.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

२.२) शासकीय उपसा सिंचन योजनांचे दर परिशिष्ट १ मधील इतर अनुषंगिक तरतुदीमधील परिच्छेद २ नुसार राहतील.

२.३) ज्या क्षेत्रावर पाणी मोजून देण्याची व्यवस्था नसेल त्या क्षेत्रावर प्रवाही सिंचना करीता वैयक्तिक लाभ धारकांसाठी पाण्याचे क्षेत्राधारीत ठोक जल प्रशुल्क परिशिष्ट १ मधील तक्ता क्र. ३ नुसार राहतील.

२.४) घरगुती वापरासाठीचे अनुज्ञेय दर (Applicable Rate) परिशिष्ट २ नुसार राहतील.

२.५) औद्योगिक वापरासाठीचे अनुज्ञेय दर (Applicable Rate) परिशिष्ट ३ नुसार राहतील.

३.० पाणी वापराच्या हिशोबासाठी जलवर्ष १ जुलै ते पुढील वर्षाच्या ३० जून पर्यंत असे विचारात घ्यावे.

४.० या आदेशान्वये निर्धारित केलेले ठोक जल प्रशुल्क दर जलवर्ष १ जुलै २०२२ पासुन पुढील ३ वर्षासाठी लागू राहतील.

५.० कोविड-१९ साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील विविध घटकावरील परिणाम लक्षात घेता दिनांक १ जुलै २०२० ते ३० जून २०२२ या कालावधी साठी दि. १८जानेवारी २०१८ च्या आदेशा नुसार निर्धारित केलेले ठोक जलप्रशुल्क म्हणजेच सदर आदेशातील शेवटच्या वर्षाचे (दि. १ जूलै २०१९ ते ३० जून २०२०) प्रचलित दर लागू राहतील.

६.० १ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या जलवर्षासाठी (Water Accounting Year) परिशिष्टातील दर हे प्रतिवर्ष १०% सरळ दराने वाढीसह लागू राहतील.

७.० १ जुलै २०२४ ते ३० जून २०२५ या जल वर्षासाठी परिशिष्टातील दर हे २०% वाढीसह लागू राहतील.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

८.० परिशिष्ट १, २ व ३ मधील दर हे स्थानिक उपकराव्यतिरिक्त आहेत. शासनाकडून वेळोवळी निश्चित केल्यानुसार स्थानिक उपकर स्वतंत्ररित्या देय राहतील.

९.० उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर व्हावा, आरक्षित पाणी विना वापर राहू नये यासाठी बिगरसिंचन वापरकर्त्यास टप्पा नियोजनाची मुभा देण्यात येत आहे. बिगर सिंचन पाणी वापर कर्ता त्यांना मंजूर पाणी वापराचा विनियोग टप्प्या टप्प्यात करणार असल्यास याबाबतचे नियोजन त्यांनी जलसंपदा विभागास करारा पूर्वी द्यावे. या पाणी वापराचा टप्पा नियोजनाची तरतुद करारात करण्यात यावी. पाणीपट्टीची आकारणी या टप्पा नियोजनामधील पाणी वापरानुसार करण्यात यावी. मात्र उर्वरित पाण्याच्या परिमाणावर (एकूण मंजूर पाणी - टप्पा नियोजनातील पाणी) ५% दराने हमीशुल्काची आकारणी करावी. तसेच प्रत्यक्ष पाणी वापर व टप्पा नियोजनातील पाणी वापर यात १०% पेक्षा जास्त विचलन असल्यास पुढील प्रमाणे आकारणी करावी.

प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियोजनातील पाणी वापराच्या परिमाणाच्या ९०% पेक्षा कमी असल्यास टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% इतक्या परिमाणावर आकारणी करावी. प्रत्यक्ष वापर हा टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% ते १००% या मर्यादेत असल्यास अनूज्ञेय दराने आकारणी करावी. मात्र प्रत्यक्ष वापर टप्पा नियोजनातील परिमाणाच्या १००% पेक्षा जास्त असल्यास अशा जास्तीच्या परिमाणावर परिशिष्टात नमूद तदनुषंगीक तरतूदीनुसार दंडनीय दराने आकारणी करावी.

१०.० प्रवाही सिंचनामध्ये होणारा अनियंत्रित पाणी वापर व पाणी नाश नियंत्रित करण्यासाठी यापुढे सिंचनासाठीचा संपूर्ण पाणी पुरवठा व पाणीपट्टी आकारणी घनमापन पद्धतीने करणे प्रस्तावित केले आहे. तथापी, घनमापन पद्धतीने आकारणी करताना येणा-या समस्यां विचारात घेवून पाणी वापर संस्था (WUA), उपसा सिंचन योजना वगळून इतर वैयक्तिक पाणी वापरकर्त्यांना पाणी मोजमाप यंत्र बसवेपर्यंत क्षेत्राधारित ठोक जलप्रशुल्क (पीक निहाय व हंगाम निहाय) आकारण्यात यावे.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★MUMBAI★

११.० राज्य शासनाने नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया-पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण नगर विकास विभागाच्या दि. ३० नोव्हेंबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार जाहीर केलेले आहे. या धोरणातील तरतुदीनुसार प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराची दरनिश्चिती करण्याचे अधिकार उक्त धोरणातील परिच्छेद १२ मध्ये नमूद केलेली समिती / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांना आहेत. सदर धोरणामुळे खालील बाजूच्या जलस्त्रोताच्या गुणवत्तेत होणारी वाढ तसेच सांडपाण्याच्या पुनर्वापरामुळे नैसर्गिक पाण्यावरील ताण कमी होण्यास मदत होत असल्याने अधिनियमातील कलम १२(५) मधील तरतुदीनुसार प्राधिकरण जाणीवपूर्वक सदर धोरणास पाठिंबा (Support) देत आहे. मात्र हे धोरण राबवतांना खालील तरतुदीचे अनुपालन होणे गरजेचे आहे.

अ) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रक्रिया केलेले सांडपाण्याचे वहन प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे अथवा टँकरने करण्यात यावे.

आ) प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सिंचन प्रयोजनार्थ पुनर्वापरासाठीचा दर प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या ६०% पेक्षा अधिक असणार नाही.

इ) प्रक्रिया केलेले सांडपाणी कालव्यात / नैसर्गिक नदी किंवा नाल्यामध्ये सोडल्यास अश्या पाण्याचे विनियमन महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ११(१) नुसार करण्यात यावे. या पाण्याच्या वापरासाठीचे दर नैसर्गिक पाण्यानुसारच राहतील.

१२.० बिगर सिंचन पाणी पुरवठ्याचे करार करताना खालील बाबींचा अंतर्भाव करार नाम्यात असेल याबाबत ठोक जल पुरवठा गटाने (Bulk Water Supply Entity) आणि ठोक जल वापर कर्ता (Bulk Water User Entity) यांनी दक्षता घ्यावी.

अ) पाण्याच्या स्त्रोताची अचुक वर्गवारी (source)

ब) अनुज्ञेय दराबाबत सुस्पष्ट तरतूद.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

क) पाण्याच्या स्त्रोताची वर्गवारी व अनुज्ञेय दर व पाण्याच्या परिमाण (quantity) याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी व्यवस्था / तरतूद.

ड) औद्योगिक प्रयोजनासाठी पाण्याचे वाटप (quota) निश्चित करताना प्रक्रिया (processing) करण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी व कच्चा माल म्हणून वापरण्यात येणारे पाणी (manufacturing) आणि सदर उद्योगातील कर्मचारी वसाहतीसाठी वापरण्यात येणा-या पाण्याचे परिमाण निश्चित करावे व ज्या प्रयोजनासाठी कोटा निर्धारीत करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी पाण्याचा प्रत्यक्षात वापर केला जातो याची खातरजमा करावी व विसंगत वापर आढळून आल्यास दंडनीय दराने आकारणी करावी.

१३.० दरवर्षी ३० सप्टेंबर पर्यंत सर्व सिंचन महामंडळांनी पाणी वापर प्रवर्ग निहाय ३० जून रोजी संपलेल्या सिंचन वर्षातील जमा झालेली पाणीपट्टी, सिंचन प्रकल्पाच्या देखभाल-दुरूस्तीवर केलेला खर्च, शासकीय उपसा सिंचन योजनांच्या वीज देयकावरील खर्च, शासकीय उपसा सिंचन योजनांवरील देखभाल-दुरूस्ती खर्च, घरगुती व औद्योगिक वापरावरील सुटी / सवलती यामुळे महसुलात झालेली घट व दंडनीय तरतुदीमुळे महसुलात झालेली वाढ याबाबतचा तपशील प्राधिकरणास पुढील धोरणात्मक आखणीसाठी उपलब्ध करून द्यावा. सदर माहिती नियमितपणे उपलब्ध् करून न दिल्यास अशी कृती अधिनियमाचे कलम २६ नुसार कारवाईस पात्र राहील.

१४.० या आदेशान्वये लागु ठोक जलप्रशुल्काबाबत लाभार्थी / उपभोक्त्यांना माहिती होण्यासाठी जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिध्दी देण्याची कार्यवाही स्थानिक क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करण्याबाबत शासन स्तरावरून आदेश निर्गमित करावेत.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

१५.० **अडचणी दूर करण्याचे अधिकार** : सदर ठोक जलप्रशुल्क् आदेशाची अंमलबजावणी करताना काही अडचणी निर्माण झाल्यास संबंधित ठोक पाणी वापरकर्ता / संबंधित सिंचन महामंडळ / शासन प्राधिकरणाकडे संदर्भ् करू शकतील व याबाबतचा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१६.० सदर आदेश प्राधिकरणाच्या (www.mwrra.maharashtra.gov.in) या संकेत स्थळावर उपलब्ध् आहेत.

सहपत्र - परिशिष्ट १ ते ३

| | | |
|---|---|---|
| ( डॉ. साधना महाशब्दे ) | (श्रीमती. श्वेताली ठाकरे ) | ( संजय कुलकर्णी ) |
| सदस्य (विधी) | सदस्य (अर्थ) | सदस्य (जसं-अभियांत्रिकी) |

दिनांक: २९/०३/२०२२

स्थळ: मुंबई

(डॉ. सोमनाथ सोनवणे)

सचिव

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

# परिशिष्ट १

## कृषीसाठी ठोक जल प्रशुल्क

### तक्ता क्र. १ – प्रवाही सिंचनाकरिता पाण्याचे घनमापन दर (पैसे प्रति घमी/ १००० लिटर)

| अ.क्र. | उपभोक्ता प्रकार | दर (पैसे प्रति घमी/१००० लिटर) | | |
|---|---|---|---|---|
| | | खरिप | रब्बी | उन्हाळी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नोंदणीकृत पाणी वापर संस्था | ५.५० | ११.०० | १६.५० |
| २ | वैयक्तिक लाभधारक | ७.०० | १४.०० | २१.०० |

### तक्ता क्र.२- खाजगी उपसा सिंचन योजनांचे (उसिंयो) ठोक जल प्रशुल्क (पैसे प्रति घमी/१००० लिटर)

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्रोत | दर (पैसे प्रति घमी/१००० लिटर) | | |
|---|---|---|---|---|
| | | खरिप | रब्बी | उन्हाळी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **आश्वासित पाणी पुरवठा** | ६.५० | १३.०० | १९.५० |
| | अ) मोठ्या प्रकल्पांचे जलाशय | | | |
| | ब) मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव | ५.०० | १०.०० | १५.०० |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ५.०० | १०.०० | १५.०० |
| ३ | अंशत: आश्वासित पाणी पुरवठा | २.५० | ५.०० | ७.५० |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | ०.८० | १.६० | २.४० |

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

## तक्ता क्र. ३- प्रवाही सिंचनाकरिता वैयक्तिक लाभधारकांसाठी पाण्याचे क्षेत्राधारित ठोक जलप्रशुल्क

**(पिक निहाय व हंगाम निहाय)**

| अ.क्र. | पिक प्रकार | दर (रु. प्रति हेक्टर) | | |
|---|---|---|---|---|
| | | खरिप | रब्बी | उन्हाळी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अन्नधान्य व इतर पिके | ६०० | १२०० | १८०० |
| २ | **नगदी पिके** | | | |
| | (अ) ऊस व केळी | १८९० | ३७८० | ५६७० |
| | (ब) कापूस | ८१० | १६२० | २४३० |
| | (क) फळबागा | १४२२ | २८४४ | ४२६६ |

**इतर अनुषंगिक तरतुदी :-**

(१) जलप्रशुल्क आकारण्याच्या उद्देशाने कोकण व विदर्भ विभागासाठी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी खरीप, रब्बी, उन्हाळी हंगामाचा कालावधी खालीलप्रमाणे असेल;

| हंगाम | उर्वरित महाराष्ट्रासाठी कालवधी | कोकण व विदर्भ विभागासाठी कालवधी |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रबी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जुन | १ एप्रिल ते ३० जुन |

(२) राज्यातील शासकीय उसियोखालील क्षेत्रासाठी प्रवाही सिंचनासाठीचा मूळ दर (रब्बी) अधिक उसियोसाठीचा खर्च विद्युत आकार, उसियोंच्या शीर्ष कामाचा देखभाल दुरुस्ती व परिचालन खर्च यावर आधारित असेल. यापैकी १९ % खर्च संबंधित लाभार्थ्यांनी व उर्वरित ८१ % खर्च निकषानुसार इतर प्रवर्गाच्या वापरकर्त्यांमध्ये विभागण्यात येईल.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

शासकीय उसिंयोंसाठीचे योजना-निहाय जलप्रशुल्क संबंधित नदी-खोरे अभिकरणाच्या मुख्य अभियंता यांचे कडून जलप्रशुल्क निश्चित केले जातील.

(३) लाभक्षेत्रातील कालव्यापासून ३५ मी. पर्यंतच्या विहिरींच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या नगदी पिकांसाठी (उदा. ऊस , कापूस , केळी व फळबागा इ.) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ चे कलम ५५ च्या तरतुदीनुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या ५०% दर लागू असेल.

(४) खाजगी उसियो अंतर्गत ज्या नोंदणीकृत पाणी वापर संस्था जलमापक यंत्र बसवून घनमापन पध्दतीने पाणीवापर करीत असतील त्यांनाच परिशिष्ट १, तक्ता २ मधील नमूद दरात २५% सवलत अनुज्ञेय राहील.

(५) खाजगी उसिंयोच्या लाभार्थ्यांनी स्वखर्चाने स्रोतांच्या जागी बंदिस्त वितरण नलिकेवर जलमापक यंत्र बसवावीत. संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी/वैयक्तिक उपसा सिचंन धारकांची आकारणी क्षेत्राधारीत करावी. मात्र ही सवलत या आदेशाच्या दिनांकापासून केवळ १ वर्षासाठी अनुज्ञेय राहील. यानंतर प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

(६) खाजगी उसिंयो यांनी जलमापक यंत्र न बसवल्यास / जलमापक यंत्र बंद पडल्यास / जलमापक यंत्र मध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आल्यास प्रत्यक्ष सिंचन क्षेत्रावर आधारित पाण्याचे परिमाण परिगणित करून प्रवाही जलप्रशुल्काच्या अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करण्यात यावी.

(७) शासन निर्णय दि. ०२/०५/२०१७ अनुसार, ठोक पाणी पुरवठा गटाने विकेंद्रीत पाणीसाठया पर्यत पाणी उपलब्ध करुन दिल्यास, संबंधित वहन व्यवस्थेच्या म्हणजेच प्रवाही किंवा उपसा अनुरुप परिशिष्ट वरील तक्ता क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार जलप्रशुल्क लागू राहील. नैसर्गिक प्रवाहाद्वारे विकेंद्रित

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

साठ्यापर्यंत नियमित पाणी पुरवठा केल्यास १०% वहन व्यय आकारले जाईल. मात्र जर लाभार्थ्यांने कालव्यातून बंदिस्त नलिकेद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत पाणी घेतल्यास, वहन व्यय आकारला जाणार नाही.

(८) मत्स्यशेतीकरिता सिचंनासाठी दर परिशिष्ट १ तक्ता क्र. १ अ. क्र. २ नुसार म्हणजेच वैयक्तिक लाभधारकांना लागू घनमापन दराने आकारणी करावी.

(९) ज्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात पर्यायी जमिनी दिलेल्या आहेत त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करण्यात यावी. तसेच, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उपसा सिंचन राबवल्यास अनुज्ञेय दराच्या ५०% दराने आकारणी करावी.

(१०) खरीप पिक लांबल्यामुळे रब्बी हंगामामध्ये पाणी पुरवीले असल्यास अथवा रब्बी पिकासाठी उन्हाळी हंगामात पाणी पुरवीले तर लांबलेल्या सिंचनाच्या आवर्तनासाठी तत्सम खरीप / रब्बी दराने आकारणी करावी.

(११) प्रकल्पावरील प्रथम वर्षाच्या सिंचनासाठी (चाचणी सिंचन) जलप्रशुल्काची आकारणी करू नये.

(१२) पाण्याचे परिमाण मोजण्यासाठी जलमापक यंत्रणा उपलब्ध नसल्यास पुरविण्यात येणा-या पाण्याची क्षेत्राधारित पध्दतीने आकारणी करण्यात यावी. यासाठी पिकांची विभागणी नगदी पिके आणि अन्नधान्य व इतर पिके अशा दोन गटात करुन विहीत केलेले दर आकारावेत. हे दर आकारताना पुढील तत्त्वे अनुसरण्यात यावीत-

अ). क्षेत्राधारित आकारणी करण्यापूर्वी पिका खालील क्षेत्राचे भौगोलीक माहिती प्रणाली (Geographical Information system) द्वारे सर्वेक्षण करून क्षेत्र व पिक निश्चित करुन आकारणी करण्यात यावी.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

ब). दोन पेक्षा जास्त पाळयांव्दारे पाणी घेण्यात आले असल्यास त्या हंगामासाठी पूर्ण दराने आकारणी केली जाईल. प्रत्येक पाणी पाळीस एक चतुर्थांश अनुज्ञेय दरानुसार दोन पाणी पाळयांपर्यंत आकारणी केली जाईल.

क). या आदेशान्वये क्षेत्राधारित निर्धारित दर लागू केल्यानंतर शासनाने शा.नि. क्र. संकीर्ण -२०१४/(४३/१४)/सिंव्य (धोरण) दि. १७/१०/२०१८ अन्वये लागू केलेले दर संपुष्टात येतील.

(१३) वैयक्तिक लाभधारकांनी आधुनिक पध्दतीचा (सुक्ष्म सिंचन) अवलंब करून जलमापक यंत्र द्वारे घनमापन पद्धतीने पाणी घेतले तर त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. नोंदणीकृत पाणी वापर संस्थांनी घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेऊन सुक्ष्म सिंचन केल्यास नोंदणीकृत पाणी वापर संस्थेसाठी प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय केलेल्या दराच्या ७५% दराने आकारणी करावी.

(१४) हंगाम सुरु होण्यापूर्वी त्या हंगामाच्या जलप्रशुल्काची पूर्ण आगाऊ अदायगी केली असेल तर त्या हंगामासाठी अनुज्ञेय दरामध्ये १०% सवलत दिली जाईल.

(१५) माजी मालगुजारी तलावांच्या पाणीवापराचे दर सर्वोच्च न्यायालयाच्या केस क्र. सिव्हील अपील क्र. २४७५ (१९६८) दि. १६/०८/१९७८ च्या निर्णया नुसार राहतील.

(१६) जलसंपदा विभागाची पूर्वपरवानगी न घेता सिंचनासाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा औद्योगीक वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास औद्योगिक वापरासाठी लागू असलेल्या दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

(१७) ठोक पाणीपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधी मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI

## परिशिष्ट २

### घरगुती पाणी वापरासाठीचे ठोक जल प्रशुल्क

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | दर रू प्रती घमी /१००० लिटर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत | नगरपालिका / नगरपंचायत | महानगरपालिका | |
| | | | | घरगुती | वाणिज्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ०.३० | ०.३५ | ०.५५ | २.७५ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ०.६० | ०.७० | १.१० | ५.५० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | ०.१५ | ०.१८ | ०.२८ | १.३८ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल, तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली असेल. | ०.०५ | ०.०६ | ०.०९ | ०.४४ |

टीप: १) मंजूर पाणी अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे अधिक असेल त्या परिमाणाच्या प्रमाणात होणारा वहनव्यय पाणी वापरकर्त्याला सोसावयाचा आहे, जलसंपदा विभागाला बाष्पीभवन व्यय सोसावयाचा आहे.

२) जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील.

**इतर अनुषंगिक तरतुदी :-**

(१) महानगरपालिकांसोबत अस्तित्वातील करारनाम्यानुसार वार्षिक मागणी मंजूर करतेवेळी वाणिज्य वापराचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित केले जाईल आणि अशा पाणी वापराला वाणिज्य दराने म्हणजेच परिशिष्ट २ स्तंभ ६ नुसार दर आकारण्यात यावा.

(२) "एकात्मिक नगर वसाहत" (Integrated Township) म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १८ किंवा ४४ नुसार घोषीत एकात्मीक नागरी वसाहत ज्यासाठी ठोक पाणी पुरवठा दारांकडून थेट पाणी पुरवठा केला जातो. अशा नागरी वसाहती करीता महानगरपालिकांसाठी निर्धारित केलेल्या अनुज्ञेय दराप्रमाणे परिशिष्ट २ स्तंभ ५ दराने आकारण्यात येईल.

(३) व्यापारी संस्था /खाजगी वसाहती / नागरी वसाहती (Townships) साठी बांधकाम चालू असे पर्यंत वापरलेल्या पाण्याकरिता वाणिज्य दराने जलप्रशुल्क आकारण्यात येईल व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर होणाऱ्या पाणीवापरासाठी महानगरपालिकांसाठीचा अनुज्ञेय दर आकारला जाईल. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे जलमापक यंत्र बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी.

(४) लाभक्षेत्रातील कालव्यापासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या प्रभाव क्षेत्राच्या अंतराबाबतच्या तरतुदींनुसार क्षेत्रातील विहीरींवर ठोक पाणीवापरकर्ता गट अवलंबून असेल, तर त्यांना जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या ५०% दर लागू असेल. या ठिकाणी कालव्याची व्याख्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील कलम २ (३) मध्ये केल्यानुसार असेल.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

(५) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००%ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

(६) "प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी" या तत्वानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यातसोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणिमानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) स्थापित केलेला नसल्यास अथवा तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(७) करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

(८) ठोक पाणीपुरवठा गटाची (BWSE) पूर्वपरवानगी न घेता नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पिण्याच्या पाण्याचे पाणी हक्कातून औद्योगिक वापरकर्त्यास पाणी पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा पाणी वापरासाठी अनुज्ञेय औद्योगिक दराच्या ३.० पट दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करावी.

(९) जलमापक यंत्र बंद असल्यास/दुरुस्तीसाठी काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असल्याचे आढळून आल्यास सदर जलमापक यंत्र दुरुस्त करण्यासाठी आणि पूर्ववत करण्यासाठी एक महिन्याची लेखी पूर्वसुचना देण्यात यावी. जलमापक यंत्र ६० दिवसामध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून जलमापक यंत्र दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापी, जलमापक दुरूस्तीसाठी विहित केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

(१०) ठोक पाणी पुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसर जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

## परिशिष्ट ३

## औद्योगिक पाणी वापरासाठीचे ठोक जल प्रशुल्क

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | दर रू प्रतिघमी/ प्रति १००० लिटर) | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रक्रिया उद्योग (Processing) | निर्मिती उद्योग (Manufacturing) साठी कच्चा माल | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ११.०० | १६५.०० | ०.५५ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | २२.०० | ३३०.०० | १.१० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | ५.५० | ८२.५० | ०.२८ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल, तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली असेल. | १.७६ | २६.४० | ०.०९ |

टीप: १) मंजूर पाणी अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे अधिक असेल त्या परिमाणाच्या प्रमाणात होणारा वहनव्यय पाणी वापरकर्त्याला सोसावयाचा आहे, जलसंपदा विभागाला बाष्पीभवन व्यय सोसावयाचा आहे.

२) जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net Present Value,

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील.

**इतर अनुषंगिक तरतुदी :-**

१. प्रक्रिया उद्योग व कच्चा माल उदयोग:

१.१ "प्रक्रिया उद्योग" म्हणजे ज्या उद्योगात पाण्याचा वापर प्रक्रियेकरीता म्हणजे शीतकरण अथवा स्वच्छतेच्या किंवा तत्सम कारणास्तव करतांना पाण्याचा अतिंम उत्पादनात प्रत्यक्ष वापर (consumptive) न होता केला जातो असा उद्योग.

१.२ "कच्चा माल म्हणून वापर होत असलेले उद्योग" म्हणजे ज्या उद्योगात पाण्याचा वापर अतिंम उत्पादनात प्रत्यक्ष वापर (consumptive) असतो असे उद्योग, उदा. बाटलीबंद पिण्याचे पाणी, शीतपेये, स्पिरिट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरीज व आसवणीना (डिस्टिलरीज) किंवा तत्सम उद्योगांना स्त्रोताशी संबंधित मूळ दराच्या १५ (पंधरा) पट म्हणजेच परिशिष्ट ३ स्तंभ ४ नुसार दर आकारण्यात यावा.

१.३ "उद्योगातील घरगुती वापर" म्हणजे संबधीत उद्योग /उपक्रमात कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांच्या निवासासाठी संबधीत उद्योगाने विकसित केलेली वसाहत असा असून त्यासाठी परिशिष्ट ३ स्तंभ ५ नुसार दर आकारण्यात यावा. तथापि, उद्योगांसोबत करारनामा करण्यापूर्वी "उद्योगातील घरगुती वापर" याचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित करावे आणि त्यासाठी स्वतंत्र वितरण वाहिनी व जलमापक यंत्र आणि आवश्यक पायाभूत सुविधा इत्यादी बाबत पूर्तता करावी.

(२) लाभक्षेत्रातील कालव्यापासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या प्रभाव क्षेत्राच्या अंतराबाबतच्या तरतुदींनुसार क्षेत्रातील विहीरींवर ठोक पाणीवापरकर्ता गट अवलंबून असेल, तर त्यांना जलप्रशुल्क मूळ दराच्या ५०% दर लागू असेल. या ठिकाणी कालव्याची व्याख्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील कलम २ (३) मध्ये केल्यानुसार असेल.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

(३) "कृषी उद्योग" जसे साखर उद्योग, त्या सोबतचा सहउर्जा निर्मिती प्रकल्प, अन्नधान्य व फळ प्रक्रिया, कुक्कुटपालन, भात गिरणी, दुग्ध व्यवसाय, वनस्पतीजन्य तेल आणि तुप इ. साठी अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करावी. मात्र ऊस, मका किंवा तत्सम धान्य किंवा फळांपासून मद्यार्क,अल्कोहोल, इथेनॉल, वायनरी, ब्रुवरीज, सुगंधी द्रव्ये इत्यादी निर्मितीसाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही.

(४) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००% ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

(५) "प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी" या तत्वानुसार उद्योगांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. उदयोगांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Effulent Treatment Plant) स्थापित केलेला नसल्यास अथवा तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(६) उद्योगांनी शून्य द्रव विसर्ग (Zero Liquid Discharge) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि त्यांच्या पाणी वितरण प्रणाली मधील व्यय, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यासाठी वाटपाच्या २५% पर्यंत पाणीवापर केला तर त्या पाणी वापरास अनुज्ञेय दराच्या फक्त २५% जलप्रशुल्क आकारले जाईल. तथापी, सदर उद्योगासाठी वार्षिक

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

मंजूर पाणी मागणी किमान ७५% च्या मर्यादेपर्यंत वा त्यापेक्षा कमी करीत असेल तरच सदर सवलत अनुज्ञेय राहील. याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करुन तसे लेखी प्रमाणीत करणे अनिवार्य राहिल.

(७) उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा पुनर्वापर करता येईल. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील जलसंपदा विभागास सादर करावा.

(८) करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

(९) जलमापक यंत्र बंद असल्यास/दुरुस्तीसाठी काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असल्याचे आढळून आल्यास सदर जलमापक यंत्र दुरुस्त करण्यासाठी आणि पूर्ववत करण्यासाठी एक महिन्याची लेखी पूर्वसुचना देण्यात यावी. जलमापक यंत्र ६० दिवसामध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून जलमापक यंत्र दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापि, जलमापक दुरुस्तीसाठी विहित केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

केल्यास दंडनीय दराने म्हणजेच २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

(१०) ठोक पाणीपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वपारकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधी मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.